# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ३ रा ❑ बुधवार दि.२९ जानेवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## महाकुंभात शाही स्नान

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य



हिंदू धर्मात कुंभमेळा महत्त्वाचा मानला जातो. कुंभमेळा प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक या पवित्र ठिकाणी आळीपाळीने आयोजित केला जातो. २०२५मध्ये कुंभ नव्हे तर महाकुंभ मेळा आयोजित केला जात आहे. यावेळी तब्बल १४४ वर्षांनंतर महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे. १३ जानेवारी २०२५ पौष पौर्णिमेपासून महाकुंभमेळा सुरू झाला आहे. भक्त, ऋषी–मुनी महाकुंभात शाही स्नान करून पवित्र स्नान करतात.

शाही स्नानाला अमृतस्नान म्हणतात कारण नागा साधू आणि इतर संत हत्ती, घोडे आणि रथांवर स्वार होऊन स्नान करण्यासाठी येतात. हे दृश्य एखाद्या राजाच्या मिरवणुकीसारखे आहे. प्राचीन काळी राजे आणि सम्राट देखील ऋषी–मुनींसोबत स्नान करत असत, त्यामुळे याला शाही स्नान असे म्हटले जाऊ लागले.

महाकुंभात एकूण तीन अमृतस्नान होणार असून त्यापैकी पहिले अमृतस्नान १४ जानेवारी २०२५ रोजी मकर संक्रांतीला, दुसरे अमृतस्नान २९ जानेवारी २०२५ रोजी मौनी अमावस्येला होईल, तर तिसरे अमृतस्नान ३ फेब्रुवारी २०२५ रोजी बसंत पंचमीला होणार आहे. याशिवाय पौष पौर्णिमा, माघी पौर्णिमा आणि महाशिवरात्रीच्या दिवशीही स्नान केले जाईल.

**अमृत स्नानाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व**

महाकुंभ हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून तो भारतीय संस्कृती आणि एकात्मतेचे प्रतीक आहे. येथे नागा साधू, अघोरी आणि इतर संतांची उपस्थिती हिंदू धर्मातील विविधता दर्शवते. या काळात दानधर्म, भजन–कीर्तन, मंदिर दर्शन असे धार्मिक कार्य केले जातात. महाकुंभ हा केवळ श्रद्धेचा सण नाही तर आपल्या संस्कृती आणि परंपरांशी जोडण्याची संधीही देतो. अमृतस्नानाद्वारे, लोक त्यांचा आत्मा शुद्ध करतात आणि नवीन उर्जेने जीवन जगण्याची प्रेरणा घेतात. संगमात स्नान केल्याने जीवनातील सर्व दु:ख आणि पापे नष्ट होतात, असे मानले जाते.

प्रयागराजमध्ये १४ जानेवारी पासून महाकुंभ २०२५ सुरू झाला आहे. हा धार्मिक मेळावा ४५ दिवस चालणार आहे. २६ फेब्रुवारीला महाशिवरात्रीचे शेवटचे शाही स्नान होणार असून त्यानंतर या धार्मिक मेळाव्याची सांगता होणार आहे. महाकुंभात सहा शाही स्नान होणार आहे. १४ जानेवारी रोजीचे पौष पौर्णिमेचे पहिल्या शाही स्नानाला विशेष महत्व आहे. संत आणि भाविकांच्या उपस्थितीमुळे हा महाकुंभ अतिशय भव्य दिसतो.

असे मानले जाते की महाकुंभाच्या वेळी नद्यांचे पाणी अमृत बनते. महाकुंभात स्नान केल्याने पुण्य प्राप्त होते. तसेच महाकुंभात स्नान केल्यावर मोक्ष प्राप्त होतो. माणसाचे सर्व पाप वाहून जातात. या कारणास्तव महाकुंभात स्नान करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, परंतु महाकुंभाच्या शाही स्नानात केवळ संत–मुनीच का प्रथम स्नान करतात. या मागचे कारण काय आहे ?

**ऋषी–मुनी आधी शाही स्नान का करतात?**

वास्तविक, महाकुंभातील शाही स्नान अत्यंत विशेष मानले जाते. शाही स्नानाची वेळ ज्योतिषीय गणनेनुसार ठरविली जाते. संत हिमालयात राहतात. त्यांनी सांसारिक आसक्तीचा त्याग केला आहे. आसक्तीचा त्याग केलेल्या ऋषी–मुनींना प्रथम नद्यांमध्ये स्नान केले जाते. संतांच्या स्नानाच्या वेळी मंत्रोच्चार केला जातो, शंख वाजविला जातो आणि अगरबत्तीच्या वापराने वातावरण आध्यात्मिक आणि भक्तिमय बनते. जणू आत्मा भगवंताला भेटत आहे. लांब केस आणि मॅट केस असलेले संत प्रथम हर हर गंगाच्या जयघोषाने शाही स्नान करतात. ऋषी–मुनी प्रत्येक परिस्थितीत भगवंताच्या भक्तीत लीन असतात. हवामानाचाही संतांवर कोणताही परिणाम दिसत नाही. ऋषी–मुनींच्या स्नानानंतरच सामान्य लोक मोक्षाच्या इच्छेने स्नान करतात. हिंदू धार्मिक ग्रंथानुसार सत्ययुगापासून कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. तथापि, पुराणात तपशीलवार वर्णन नाही. त्यामुळे कुंभ पहिल्यांदा कुठे आणि केव्हा आयोजित केला गेला हे स्पष्ट नाही. कुंभमेळ्याचा इतिहास किती जुना आहे: कुंभमेळ्याची संघटना ८५० वर्षे जुनी असल्याचा उल्लेख काही ग्रंथांमध्ये आढळतो. महाकुंभाची सुरुवात आदि शंकराचार्यांनी केली होती. समुद्रमंथनापासून कुंभाचे आयोजन केले जात असल्याचे काही कथांमध्ये सांगितले आहे. गुप्तकाळापासूनच कुंभमेळा सुरू झाला असे काही अभ्यासकांचे मत आहे. याचा पुरावा सम्राट हर्षवर्धनकडून पाहायला मिळतो. त्यानंतरच शंकराचार्य आणि त्यांच्या शिष्यांनी संगमाच्या काठावर शाही स्नानाची व्यवस्था केली.जेव्हा गुरु ग्रह वृषभ राशीत असतो आणि सूर्य मकर राशीत असतो तेव्हा प्रयागराजमध्ये कुंभमेळा भरतो.

## अखेर विश्व मराठी संमेलनाचा कार्यक्रम जाहीर

ज्योतिर्मय साहित्य



**पुणे** – मराठी भाषा विभागातर्फे फर्ग्युसन महाविद्यालयात होणाऱ्या विश्व मराठी संमेलनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा जाहीर करण्यात आली. संमेलन दोन दिवसांवर येऊन ठेपली असताना कार्यक्रम नेमके काय होणार, ते सांगण्यात आले नव्हते. त्यामुळे संमेलनाविषयी साहित्य वर्तुळात जोरदार चर्चा सुरू होती. पण मंगळवारी (दि.२८) संमेलनाची कार्यक्रमपत्रिका प्रसिध्द करण्यात आली.

दोन दिवसांपूर्वी मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत यांनी विश्वसंमेलनाची माहिती दिली. पण त्यामध्ये नेमके कार्यक्रम काय असतील, त्याविषयी काहीही सांगितले नव्हते. मंगळवारी विश्व मराठी संमेलनाच्या सोशल मीडियावरील पेजवर कार्यक्रमपत्रिका आज प्रसिध्द करण्यात आली. त्यामध्ये ३१ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता बालगंधर्व रंगमंदिरपासून फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत शोभायात्रा काढण्यात येईल. सकाळी ११ वाजता उद्घाटन होणार असून, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना साहित्यभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच संगीतकार कौशल इनामदार यांचा ‘लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी’ हा कार्यक्रम होईल.

दुपारी सव्वा वाजता ‘माझी मराठी भाषा अभिजात झाली’ यावर परिसंवाद, पुस्तक प्रकाशन आदी कार्यक्रम होतील. त्यात डॉ. सदानंद मोरे, ज्ञानेश्वर मुळे, लक्ष्मीकांत देशमुख, रवींद्र शोभणे सहभागी होणार आहेत. त्यानंतर ‘मराठी भाषा आणि प्रसारमाध्यमे’यावर संपादकांचा परिसंवाद असेल. दुपारी ३.३० वाजता नव्या जुन्यांचे कवी संमेलन रंगेल. सायंकाळी ५.४५ वाजता आंतरराष्ट्रीय मंच उपक्रमांचे सादरीकरण व विशेष सांस्कृतिक कार्यक्रम होतील. हे कार्यक्रम फर्ग्युसन महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुख्यमंच येथे होतील. दुपारी प्र. के. अत्रे सभागृह (ॲम्फी थिएटर)मध्ये दुपारी २ वाजता मराठी बोलींच्या सर्वेक्षणाबाबत डॉ. सोनल कुलकर्णी सादरीकरण करतील. तर ३.१५ वाजता अनुवाद विषयक चर्चासत्र होणार आहे. त्यात रवींद्र गुर्जर, डॉ. उमा कुलकर्णी, लीना सोहनी सहभागी होत आहेत.

## ॥ प्रकाशन सोहळा ॥



निव्वळ साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील एकमेव ‘‘ज्योतिर्मय‘‘ साहित्याचे विद्यापीठचा प्रकाशन सोहळा प्रसिद्ध कवी, गीतकार, दिग्दर्शक व बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी भाषा विभाग प्रमुख श्री दासू वैद्य यांच्या हस्ते आज अगदी साध्या पद्धतीने त्यांच्याच निवासस्थानी पार पडला, त्यावेळी सोबत सौ उर्मिला वैद्य, ज्योतिर्मयचे संपादक संजय व्यापारी व साकेत स्टेशनर्सचे राजेंद्र सिमंत.

# मराठी भाषा अभिजात होती, आहे आणि राहिलच!–संमेलनाध्यक्ष डॉ.तारा भवाळकर

**शतकाकडे वाटचाल करणा–या या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला महिला अध्यक्षपदाचा सन्मान केवळ पाच लेखिकांनाच मिळाला. कुसुमावती देशपांडे (ग्वाल्हेर) दुर्गा भागवत (कराड), शांताबाई शेळके (आळंदी) डॉ.विजया राजाध्यक्ष(इंदूर) डॉ.अरुणा ढेरे(वर्धा)आणि डॉ.ताराबाई भवाळकर(नवी दिल्ली) नवी दिल्ली येथे ७२ वर्षापूर्वी ५४ वे साहित्य संमेलन झाले होते,तेव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मितीही झाली नव्हती,आणि अ.भा.मराठी साहित्य महामंडळही अस्तित्वात नव्हते.या ५४ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी केले होते; अध्यक्ष होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,आणि स्वागताध्यक्ष होते,काकासाहेब गाडगीळ.आता तीच पुनरावृत्ति यंदाही होत आहे.९८ व्या संमेलनासाठी उद्घाटक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी लाभले आहेत,अध्यक्षपदाचा बहुमान डॉ.ताराबाई भवाळकर यांना मिळाला आहे.तर स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार आहेत.**

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)





‘‘तुला कायअक्कल आहे’’ तर तो पोरगाही आपल्या आईबद्दल तशाच भावना बाळगतो. त्यामुळे नुसतं शब्दामध्ये तिचे गोडवे गाणं आणि तिला लक्ष्मी आणि देवता आणि आमकं ढमकं म्हणणं आणि प्रत्यक्षात तिचं आचरण स्वतःच त्या स्त्रीबालचं... मग ती स्त्री कुठल्याही नात्यानी असू देत ती आई असू दे, बहीण असू दे,बायको असू दे, शेजारीण असू दे, मैत्रिण असू दे. मोठी असू दे. लहान असू दे. तीच्याबद्दल तुम्ही माणूस म्हणून कसे वागता आणि त्याच्यासाठी तुमच्या कुटुंबामध्ये वातावरण कसं आहे. तुमच्या भोवतालच्या समाजात कसं आहे, ग्रंथामध्ये लिहिलेलं आणि प्रत्यक्ष आचरण यातली तफावत मला सातत्याने लहानपणापासून जाणवत आलेली आहे आणि ती विसंगती टिपण्यासाठी मी प्रयत्न फक्त करत आले. आंतरराष्ट्रीय महिला मुक्ती वर्षा मध्ये त्याला आणखीन जास्त परिमाण मिळालं आणि त्याच्यामध्ये माझ्या असं लक्षात आलं की, हे स्त्री मुक्ती वगैरे हे पाश्चमात्यांकडून आलेलं हे फ्याड आहे, आमच्याकडे असले काही नव्हतं, आमच्याकडच्या बायका कशा साध्या, सोप्या, सरळ होत्या, त्यांना हे काहीच पुरुषांचं अन्याय बिन्याच माहित नव्हतं. तर आम्ही नीट आमचं लोकसाहित्यच बघितलेलं नाहीये. म्हणजे स्त्रिया काय म्हणत आल्या स्वत:बध्दल... त्यांच्याबद्दल इतरांनी काय म्हटलं ते आम्ही बघत आलो पण बाई स्वतः बध्दल काय म्हणते,याचा आम्ही कधी विचारच केला नाही आणि मग ते माझ्या जात्यावर दळण दळणारी बाई असेल, अंगाई गीत गाणारी बाई असेल. कथा सांगणारी बाई असेल जी सांगते ,आणि मग मला कसं वागवलं जातं आणि त्यामुळे नवरा हा देव आहे हे सगळे पोथ्या पुराणात वगैरे ठीक आहे, वटसावित्रीची पूजा करताना प्रत्यक्ष बायकांना काय वाटतं ते त्यांच्यामध्ये मला दिसतं आणि मला अशा शेकडो ओव्या सापडल्या.

व्वा,छानच आहे की. जात्यावरच्या ओव्यातून ते कसे आढळले.आणि आपल्यावर यातून वाचनाचा संस्कार कसा घडत गेला. कारण मी स्वतः लहानपणापासून जात्यावर दळण दळत ओव्या पाठ झालेली बाई आहे, पुस्तकातून वगैरे काही असल्या कुठल्या आलेल्या नाहीयेत. त्यामुळे मला गोळाबीळा काही करावं लागलं नाही, मी ज्या वातावरणात जगत आले, त्या वातावरणा मधून माझ्याकडे आलेलं आहे आणि माझं वाचन अफाट होतं, सुदैवाने मला माणसंही भरपूर भेटली आणि वाचनासाठी मी अक्षरशः वेडयासारखे उद्योग केले. म्हणजे पुस्तकं मिळवण्यासाठी ग्रंथालयं पालथी घातली. माझ्या घरी असं काही वातावरण नव्हतं. ८५ वर्षापूर्वी घरामध्ये मुलीला शिक्षण देणे वगैरे ही सुध्दा काही फारशी प्रेमाची गोष्ट नव्हती. शाळेत सुध्दा कधी कोणी घातलं नाही, मीच रडायची आणि कुठेतरी पोरांच्या बरोबर शाळेत जायची. अशाप्रकारे माझं शिक्षण झालं;परंतु मला वाचनाची ओढ खूप होती. शाळेमध्ये आमच्या ग्रंथपेट्या चांगल्या असायच्या, त्याच्यातली सगळी पुस्तकं वाचणं, ज्याज्या गावामध्ये वडिलांची बदली होईल तिथे ग्रंथालयं धुंडाळणं आणि त्या ग्रंथालयांनी मला खूप मोठा आधार दिला. म्हणजे भारतभरच्या ग्रंथालयांनी फक्त आपल्याच गावातल्या असे नव्हे. आणि जेव्हा मी लोकांना माहित व्हायला लागले त्यावेळेस मला एशाएटिक लायब्रीसारख्या व ब्रिटिश लायब्ररी सारख्या लायब्रीजनी मला खूप मोठे सहकार्य दिलेलं आहे त्यामुळे ख–या अर्थानी ग्रंथ हे माझे गुरु आहेत. माझा अनुभव आणि माझी वाकडा विचार करण्याची बुध्दी, मी सरळ विचार करणारी बाई नाहीये, हे सगळं आपण लगेच मान्य करता.

नाही,तुम्ही सांगितलं आणि मी मान्य करेन असं नाही, ते खरं आहे की खोटं आहे ते प्रत्यक्ष अनुभवावरुन पडताळून पाहणार. तुम्ही म्हणता म्हणून मी ते मान्य करेन असं नाही. आणि मग जात्यावर दळण दळणारी माझी बाई काय म्हणते हे आमच्या पुरुष संशोधकांनी सुध्दा पाहिलं नाही, बायकांनी तर सोडूनच द्या आणि बायकांनी तर असं उघड उघड किती ओव्या... शेकडो ओव्या मला सांगता येतील परंतु आता त्याला अवसर नाहीये.

याचे एखादे उदाहरण सांगते,साधी एक ओवी... की पुरुष कावेबाजपणानी वागतो हे आजचीच बाई म्हणत नाही. जात्यावर दळण दळणारी माझी बाई म्हणते... ग्रामीण बोलीत बोलतीये.... ‘‘विंद्रावन डोंगरीत्या रहावा... इंद्रावन नावाचं कडू फळ असतय डोंगरात, कडुवींद्रावानं डोंगरी त्या रहावा..पुरुषाचा कावा मला वेडीला काय ठावा...’’ आता येड पांघरुण पेडगावला जाणे आहे का मी. याच्यामध्ये सूक्ष्म विनोद आहे, सटायर आहे. ज्याला आपण उपरोध म्हणतो, तो आहे त्यामुळे या पुरुषाच्या कावा आम्हाला माहित नव्हतं असं नाही... ‘‘कावळयानं कोटकेलं बाबूळ बनामंदी, पुरुषाला मया थोडी नारी उमजं मनामंदी’’ त्यामुळे या बायाच बायांना सांगत होत्या. नवीन लग्न झाल्यानंतर बाया कौतुक करतात, माझा नवरा असा तसा... असंच कौतुक करतो, तसच कौतुक करतो..

विशेष मुलाखत

प्रशांत गौतम

दिपाली यादव–फाळके

मग माझ्याच सारखी पिकल्या केसासारखी एखादी म्हातारी सांगते ‘‘पिरतीचा भर्तार नको पिरतीवरी जाऊ...... पाण्यातली नावू काही कळना अनुभऊ (आता तो प्रेम प्रेम म्हणतोय, गोंडा घोळतोय तुझ्या भोवती... अजुन तुझ्या प्रपंच्याची नाव पाण्यात जायची आहे, ती एकदा पाण्यात गेली की मग अनुभव येईल तुला काय आहे ते)’ आता या बाईला तुम्ही आडाणी म्हणणार का? तीला लिहितावाचता येत नसेल.. आमच्याकडे दुर्दैवाने असा एक समज आहे की, लिहितावाचता येणं म्हणजेच शिक्षण आणि बायकांना शिक्षण नव्हते म्हणजे त्या आडाणी होत्या, याच्या इतका महामूर्खपणा कुठलाही नाहीये. मी याला महामूर्खपणाच म्हणते कारण माणसं विचार करणारी आहेत, ती अनुभव घेणारी आहेत, ते आपला अनुभव नेमक्या शब्दात व्यक्त करणारी आहेत, त्यांच्याजवळ छानपैकी विनोद आहे आणि लोकपरंपरेमधल्या बायकांच्यात आणि पुरुषांच्यात जेवढी विनोद बुध्दी आहे, तेवढी शहाण्या सुरत्या म्हणवणाऱ्या लोकांच्यामध्ये सुध्दा नाहीये. सांगायचं तात्पर्य लोकसंस्कृती व लोकसाहित्य म्हटलं की नुसत्या ओव्या, पोवाडे अन् गाणी असं नाही जगण्याचे जे काही सगळे आयाम असतात, जगण्याचे जे कोनेकोपरे असतात हे सगळं मिळून संस्कृती होत असते. **(क्रमशः)**



## लक्षवेधी छायाचित्र....



निळ्या नभी हा खेळ संध्येचा..

(छाया – मनोहर मंडवाले, कल्याण)

## दिल्लीतील कविसंमेलनासाठी प्रा महादेव खोत यांची निवड


ज्योतिर्मय साहित्य

**बेळगाव** – दिल्लीत २१ ते २३ फेब्रुवारी या काळात होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कविकट्टा या काव्यमंचावर कविता सादर करण्यासाठी बेळगावमधील कवी प्रा. महादेव खोत यांची निवड झाली आहे. उचवडेतील (ता. खानापूर) रहिवासी असलेले प्रा. खोत यांच्या अशी का वागतात माणसं ? या कवितेची कविसंमेलनासाठी निवड करण्यात आली आहे. कविकट्टा कार्यक्रम २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ११ यावेळेत होणार आहे.

प्राध्यापक महादेव खोत जन्म जांबोटी जवळील अत्यंत दुर्गम भागातील उचवडे येथे झाला. शालेय शिक्षण सातवी पर्यंतचे गावातच त्यांनी पूर्ण केले असून त्यानंतर माध्यमिक शिक्षण किणये येथे झाले. आर पी डी महाविद्यालयात त्यांचे उच्च शिक्षण झाले व राणी चन्नम्मा विद्यापीठातून एम. ए. मराठी पदव्युत्तर झाले आहेत. सेवा : इन बेळगाव चैनल न्यूज या वरती काम. सध्या आर पी डी महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत. साहित्य : ‘‘गावाकडच्या गोष्टी‘‘ समांतर क्रांती या प्रकाशातून पुस्तक प्रकाशन, ‘‘डोंगराळ माणसं‘‘ अक्षरदीप या अंकातून कविता प्रसिद्ध. हेळवी ही कथा पुढारी दैनिक अंकातून प्रसिद्ध. कविता : बाप, सीमाभाग, लोकशाही, माणसं यासारख्या अनेक कविता लेखन.


पाणवठा

तहान फक्त पाण्याचीच नसते..!



। ग्रेटभेट ।
कवी अशोक नायगावकर
(प्रसिद्ध हास्य कवी, मुंबई)

। उद्घाटक ।
मा. प्रा. ( डॉ. ) विजय फुलारी
कुलगुरू

। प्रमुख उपस्थिती ।
प्रा. ( डॉ. ) वाल्मीक सरवदे
प्र. कुलगुरू

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर
पीएम–उषा ( मेरू ) अंतर्गत

पा ण व ठा
तहान फक्त पाण्याचीच नसते..!

अन्न–वस्त्र–निवारा या माणसाच्या प्राथमिक गरजा आहेत.
माणसाला भूक लागते, तहान लागते;
पण तहान फक्त पाण्याचीच नसते.
महामानवाने महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला,
ती तहान फक्त पाण्याचीच नव्हती.

सर्वांगिण विकासासाठी ज्ञान–विज्ञानाबरोबरच
कला–साहित्य–संगीत यांचीही तहान असते.
ही सांस्कृतिक तहान भागविण्याकरिता आम्ही ‘पाणवठा’ हा
उपक्रम सुरू करीत आहोत. आपण यावे, आम्ही आपली वाट पाहतोय...

बुधवार, दि. २९ जानेवारी २०२५
वेळ : संध्याकाळी ५ वाजता.
स्थळ : विद्यापीठ नाट्यगृह

प्रा. दासू वैद्य – समन्वयक | डॉ. कैलास अंभुरे – संचालक, विद्यार्थी विकास | प्रा. प्रशांत अमृतकर – कुलसचिव



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com




## आनंदी पहाट...

# सुखद आठवणींना उजाळा देत राहावे

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्यापैकी प्रत्येकांत काही उणिवा असतातच, उणिवा नसणारी व्यक्ती सापडणे सद्य:स्थितीत विरळाच; त्याचा शोधही न घेतलेला बरा. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यांत काहींमध्ये संकृतीचे तर काहींमध्ये काही विकृतीचे दर्शन आपल्याला घडत असते. अर्थातच कोणत्याही विकृतीची स्वीकृती आपण सहसा करत नाही, पण आपल्या संकृतीला आणि आपापल्या प्रकृतीला साजेशी एखादी कलाकृती ठरेल अशी कृती करण्याची आपल्याला जाणीव काहीवेळा का होत नाही? कालच्या काही उणिवा कुरवाळत बसण्यात आपण धन्यता मानतो, सतत उणिवांचीच, समस्यांचीच, द:खाचीच सर्वत्र आणि सातत्याने चर्चा करत राहतो. आजच्या आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरंच गांभीर्यानं विचार करतोच असे नाही. आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून, आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे. ह्यासाठी आपल्या प्रत्येकाचेच विचार, वर्तन आणि व्यवहार हे स्वतः पुरते मर्यादित न ठेवता इतरांच्या उणिवा दूर करून, त्यांच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याच्या कामी यायला हवेत. आपल्या गत आयुष्यात रममाण व्हायला आपल्याला प्रत्येकालाच हवे असते, ते अधिक प्रियही असते. आपल्या प्रत्येकाच्याच साठवणीतल्या अनेक आठवणी असतात. हर्षाच्या-स्पर्शाच्या, घरच्या-दारच्या, प्रीतीच्या-मैत्रीच्या, स्पर्धेच्या-बक्षिसांच्या, शाळेच्या-कॉलेजच्या, बालपणीच्या-तारुण्याच्या; अशा एक नाही तर अनेकविध आठवणीत आपल्या अंतर्मनाला सुखावण्यासाठी अनेकदा त्या आपण स्मरत असतो. ह्यांत काही आठवणी सुखाच्या-दुःखाच्या, रागाच्या-वादाच्या, विरहाच्या-प्रहाराच्या, प्रयासाच्या-त्रासाच्या, मानाच्या-अपमानाच्या अशा मिश्र स्वरूपाच्याही असतात. अनेकदा काही घटना आपण कितीही आठवायच्या ठरवल्या तरीही नीट, पूर्णपणे आठवता येतातच असे नाही; तर काही घटना मात्र अनावधानाने, आपोआप आपल्या डोळ्यासमोर पुनःश्च यायला लागतात. खरेच, ह्या मनाचे नेमके काय रसायन आहे, आपल्याला काही कळत नाही.

# बाजी जिंकून देणारी माणसं ...




**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात अशी काही माणसं येतात की जी आपल्याला साहाय्यभूत ठरतात. प्रत्येकाचे आयुष्य ही एक प्रकारची परीक्षाच असते. अनेक संकटे आपल्या धैर्याची आणि सहनशक्तीची परीक्षा पहात असतात. अशा वेळी काही माणसे आपल्या मदतीला धावून येतात. त्यांच्यामुळे आपल्याला आयुष्यात काही करणं शक्य होतं . अशी साहाय्यभूत होणारी माणसं आपल्याला आयुष्यभर लक्षात राहतात.

खूप माणसं अशी असतात की जे इतरांनी त्यांच्यासाठी केलेलं योगदान नाकारतात. हे यश, कीर्ती, पैसा हे फक्त मी आणि माझ्या जीवावर कमावले आहे असा गर्व त्यांना असतो. पण वस्तुस्थिती कधीच अशी नसते. कोणतीही एकटी व्यक्ती समाजामध्ये फक्त स्वतःच्या जीवावर प्रगती करू शकत नाही. पण अर्थात त्यांनी वस्तुस्थिती नाकारल्याने परिस्थिती बदलत नाही. पण काळ ही गोष्ट अशी आहे की एक दिवस अशा माणसांना तो त्यांची जागा दाखवून देतोच. रावणासारख्या त्रिलोक विजयाची घमेंड मिरवणाऱ्या माणसाची देखील काळ आला की वाताहत होते.



आयुष्य म्हणजे नेहमी चांगल्या आणि वाईटात चाललेला संघर्ष असतो. आपण नेहमी असं म्हणतो की धर्माच्या बाजूने, सत्याच्या बाजूने चालणाऱ्यांचा नेहमीच विजय होतो. या अर्थाची सुभाषितंही आहेत. यतो धर्मस्ततो जय : हे खरे असले तरी धर्माच्या बाजूने किंवा सत्याच्या बाजूने चाललेली लढाई ही तेवढी सोपी नसते. या ठिकाणी धर्म हा शब्द जीवन जगण्याची पद्धत किंवा आपली नीतिमूल्ये पाळणे या अर्थाने आहे. तो रूढ धार्मिक अर्थाने नाही. तर ही लढाई कधी कधी सहनशक्तीचा खूप अंत पाहणारी असते, निराश करणारीही असते. पण अशाही परिस्थितीत जे आपले मानसिक धैर्य टिकवून ठेवतात आणि शेवटपर्यंत परिस्थितीशी न थकता दोन हात करतात, ते विजयी होतात.

मी म्हटल्याप्रमाणे ही लढाई सोपी नसते. पण ही जिंकण्यासाठी काही माणसे निश्चितच आपल्याला मदत करतात. त्यांच्या साहाय्याने हे युद्ध आपण जिंकू शकतो. आपण सध्या जे रामायण आणि महाभारत धारावाहिक पाहतो आहोत, त्यात असे अनेक प्रसंग आपल्याला दिसतील. त्यातील पुनरावृत्तीचा दोष माझ्याकडे घेऊन सुद्धा मी त्यांचा उल्लेख या ठिकाणी करणार आहे.


प्रसंग एक

रावण सीतेला पळवून नेतो. राम लक्ष्मण आणि सुग्रीवासहित सगळी सेना तिचा शोध घेते. सगळे हतबल होतात. मी वर म्हटल्याप्रमाणे राम हा सत्याच्या, न्यायाच्या मार्गाने चालणारा आहे. पण तरीही या ठिकाणी सीता शोधात त्याला हनुमानाचे मोलाचे साहाय्य होते. अन्यथा तिचा शोध लागणे कठीण होते.

प्रसंग दोन

राम लक्ष्मणाला इंद्रजित नागास्त्र सोडून मूर्च्छित करतो. हे संकट त्यांच्या जीवावरच बेतलेले असते. अशा वेळी हनुमान गरुडाला घेऊन येतो आणि त्यांना त्या नागपाशातून मुक्त करतो.

**(क्रमश:)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

**ज्योतिर्मय साहित्य**

संतस्तवननाम


समास पाचवा

वाणी, बुद्धी, मन या शक्तिच्या पलीकडे आत्मवस्तु आहे . या आत्मवस्तुचे स्वरूप पाहिले तर तिच्य पुढे सर्व शंकांचे निरसन होते. सर्व शंका मावळतात प्रयत्न वाया जातात तर्काच्या सहय्याने गेल्यास तर्कच क्षीण होऊन जातो. मायेच्या पलीकडे असणाऱ्या अनंत परमात्मा वस्तुचा ती वस्तु मिळवण्यासाठी सोईचा ऊपमा फक्त संतच सांगु शकतात. संत हे परमात्मा नंदाचेस्थान संपूर्ण सुखमय तेजोमय संतोषी, आत्मानंद देणारे असतात संतांच्या जव। अखंड विश्रांती व सदैव समाधान च असते.

सम्यक ज्ञान, सम्यक आचार, सम्यक विचार सद्गुणमिळते आदर भक्तिची अनंत लयलुट झाली की संतपद आपोआप चालत येते. संत धर्माला जागवतो सायुज्यमुक्तीचे स्थान विश्रांती स्थान म्हणजे सतांत्मा होय.संत मोठे श्रीमंत असतात असंख्य दरिद्री जीवांना मोक्षलक्ष्मी देऊन राजासारखे श्रीमंत करतात. जे परब्रम्ह द्रुश्य विश्वाहुन वेगळे आहे. वेद श्रुती ज्याला जाणु शकत नाहीत ते परब्रम्ह संतांच्या सहय्याने साधकाच्या अंत:करणात वास कळते. मंगलाची आशा संतांच्या आशिर्वादाने पुरी होते. संतांच्या प्रबोधनावर विश्वास ठेऊन नैमित्तिक कर्म व सद्भक्तिने वागले तर संतांचा सहवास लागण्यास वेळ लागत नाही. परमानंद मिळवायचा असैंल तर सतत संतांचा विचार केला पाहिजे. त्रेलोक्यात शोधले तरी सापडणार नाही असे अलौकिक दान संतांच्या सहवासाने मिळते.

सफल जीवनाचे सत्यरूप म्हणजे संतांची भेट होणे होय. दासबोधाचा अभ्यास करत असताना प्रत्येक शब्दात संतांची भेट होते हे दिसुन येते.पण ते समजण्यासाठी संतांचा आशिर्वाद फक्त हवा.

जय जय रघूवीर समर्थ



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नामाचे प्रेम नामाच्या सहवासाने येईल

**ज्योतिर्मय साहित्य**

नामात प्रेम येण्यासाठी आपल्या प्रेमळ आईकडेच बघा. मुलाला जरा ताप आला तरी आईच्या पोटात धस्स होते अन्न गोड लागत नाही अशा अनेक गोष्टी होतात. थोडक्यात म्हणजे तिला सर्व बाजूंनी अस्वस्थता उत्पन्न होते. नाम घेण्यात थोडा व्यत्यय आला तर आपली स्थिती तशी होते का याचे उत्तर आपल्याला स्वत:कडूनच मिळण्यासारखे आहे.

नाम घेणे हा माझा धर्म आहे ते माझे आद्य कर्तव्य आहे त्याच्याशिवाय जगणे म्हणजे मेल्यासारखेच आहे नाम घेण्यात माझे आत्यंतिक हित आहे किंबहुना मी नामाकरिताच जन्माला आलो आणि तद्रूपच होऊन जाईन इतक्या प्रज्वलित भावनेने नाम घेणे जरूर आहे आणि मग प्रेम आले नाही ही गोष्ट शक्यच नाही. प्रेम येत नाही याचा अर्थच हा की आम्ही नाम खर्या आस्थेने घेत नाही. ह्या सर्वांवर उपाय म्हणजे घेण्याच्या निश्चयाने ते जसे येईल तसे घेत राहणे. तेच नाम आपल्याला एक एक पाऊल पुढे नेऊन ध्येय गाठून देईल. परिस्थिती चांगली आली म्हणजे नाम घेईन असे म्हणणारा मनुष्य नाम कधीच घेत नाही.


नाम हे मनात किंवा उच्चार करूनही घेता येते. नामात राहावे म्हणजे अंत:करणाची शुध्दता होईल आणि अंत:करण शुध्द झाले की भगवंताचे प्रेम येईल. नुसत्या पुष्कळ जपापेक्षा विवेकाने आणि विचाराने आलेले प्रेम नामात असणे जरूर आहे. खरे म्हटले म्हणजे नामांतच नामाचे प्रेम आहे. ताकात लोणी असतेच, फक्त ते वर दिसत नाही पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते तसे भगवंताचे नाम आपण घेतले की त्याचे प्रेम आपोआप वर येते. साध्या शब्दांचादेखील आपल्या वृत्तिवर परिणाम होऊन तो तो भाव आपल्या मनात जागृत होतो मग भगवंताच्या नामाने भगवंताचे प्रेम का येणार नाही ? आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा. पुष्कळ दिवस एका घरात राहिल्याने त्या घराविषयी आपल्याला प्रेम येते ना ? प्रपंचाचे प्रेम आपल्याला सहवासाने आले आहे. तसे नामाच्या अखंड सहवासाने त्याचे प्रेम आपोआपच येईल. उठता बसता चालता बोलता आपण अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न करावा. कोणतेही व्यसन कालांतराने पचनी पडते आणि मग मनुष्य जास्त जास्त त्याच्या आधीन जातो. अफूचे पहा दिवसेंदिवस त्या माणसाला जास्त अफू लागते. त्याप्रमाणे भगवंताच्या चिंतनाचे आपल्याला व्यसन लागले पाहिजे. कोणतीही चांगली गोष्ट साधायला कठीण असणारच; पण अगदी थोडया श्रमात पुष्कळ साधून देणारे नामासारखे दुसरे साधन नाही. म्हणून नेहमी मनाने नाम घेत असावे.

८. नामाचे प्रेम यायला एक गुरूंना ते आवडते म्हणून घ्यावे किंवा दुसरे नामातच माझे कल्याण आहे या भावनेने घ्यावे.

## संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७



# अन्नाचा स्वीकार

**ज्योतिर्मय साहित्य**

मला घरातील ज्येष्ठ मंडळी कायम स्मरणात असतात. त्यांची काही वाक्ये लहानपणी पासून ऐकतो. त्यावेळी फारसे कळायचे नाही. पण मोठ्यांना उलट प्रश्न विचारण्याचा तो काळ नव्हता. पण त्या मुळे मनावर चांगले संस्कार कोरले गेले. आणि त्यातील काही वाक्ये आत्ता लक्षात येतात आणि ती किती महत्वाची होती हे लक्षात येते. कोणत्याही पदार्थाला नकार दिला की एक वाक्य आजी कायम म्हणायची, कोणाचाही हात मोडू नये. हे ऐकून त्यावेळी आम्ही तोंडावर हात ठेवून हसत असू. मोठ्याने हसलो किंवा उलट बोलले तर मार मिळेल या भीतीने गुपचुप हसायचे. आणि हात कसा मोडतो? हा प्रश्न पडायचा. पण त्याचा अर्थ जसे वय वाढत गेले तसा लक्षात यायला लागला. आणि हे पूर्वीचे संस्कार फार महत्वाचे आहेत हेही जाणवते.

समोर आलेले अन्न आपण स्वीकारले नाही किंवा त्याला नकार दिला तर त्याचा आनादर होतो. आणि ज्या व्यक्तीने आपल्याला दिलेले असते त्या व्यक्तीचाही अपमान होतो. त्यामुळे आपल्याला न आवडणारा पदार्थ समोर आला तर त्याला कधीही नकार देऊ नये. त्याचा आदर करण्यासाठी त्यातील एखादा अल्पसा घास तरी ग्रहण करावा. मी कित्येकदा असा अनुभव घेतला आहे, की एखादा पदार्थ नाकारला तर दिवसभर काहीच खायला मिळत नाही. अगदी जवळ पैसे, स्वतःचा जेवणाचा डबा असेल तरी जेवणासाठी वेळ मिळत नाही.

अजून एक विचार असा आहे, ज्या अन्ना मुळे आपले भरण पोषण होते त्याच अन्नाने आपला अनादर केला तर? आपल्या शरीरात ''अन्नद्वेष'' निर्माण झाला तर? आपले जगणे पण अशक्य होऊन जाईल. म्हणून कोणतेही अन्न मना पासून स्वीकारावे. तरच ते चांगले पोषण करते. आपण अन्नाला व पाण्याला भावना देऊ शकतो. त्या भावना अन्न ग्रहण करते. अन्नाला सकारात्मक व चांगल्या भावना देण्यासाठी आपल्या कडे स्वयंपाक करताना पाळायचे काही नियम असतात.

त्यामुळे हे ''अन्नाचा स्वीकार'' हे व्रत म्हणून सर्वांनीच आचरणात आणावे. तेच संस्कार आपल्या मुलांवर होणार आहेत. सोपे पण महत्वाचे व्रत आहे ना? माझ्या मताशी सहमत आहात का? नक्की कळवावे.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**प्रस्तावना :** भारतीय वाङ्मयाच्या इतिहासात जसे कथा, आख्याने, व्याकरण ग्रंथ, उच्चारणशास्त्र ग्रंथ, तत्त्वज्ञानपरक ग्रंथ यांचे स्थान आहे, त्याच प्रमाणे नीतीशास्त्राच्या ग्रंथांचे देखील महत्वपूर्ण असे स्थान आहे. नीतीशास्त्रीय वाङ्मयात विशेषत: माणसाने चांगले जीवन जगण्याकरीता ''काय करावे आणि काय करू नये'' या विषयी प्रतिपादन केलेले असते. प्राचीन भारतीय साहित्यात भर्तृहरिविरचित-नीतिशतकम्, कामंदकीय नीतिसार, कौटिल्याचे अर्थशास्त्र इत्यादी ग्रंथांचा समावेश होतो.

भर्तृहरि हे एक यशस्वी राजे होते. त्यांच्या कालखंडाविषयी विद्वानांमध्ये एकमत नाही. काही विद्वान त्यांचा काळ इसवी सन ७८ सांगतात. तर काही विद्वान त्यांचा कालखंड इसवी सन ५४४ सांगतात.

त्यांनी नीतिशतकम, वैराग्यशतकम्, शृंगारशतकम् अशी शतक काव्ये तसेच वाक्यपदीयम् हा शास्त्रीय ग्रन्थ यांची रचना केली आहे.

नीतिशतकम् या ग्रंथात त्यांनी १०० पेक्षा अधिक श्लोकांमधून सज्जनांची लक्षणे, मुर्खांची लक्षणे, विद्वानांची लक्षणे, कर्माचे महत्व, सत्कर्माचे महत्व, सुसंगतीचे महत्व इत्यादी विषयांवर उद्बोधक विचार मांडले आहेत. शिक्षक, विचारवंत, अभ्यासक, प्रवचनकार, कीर्तनकार आणि पालक अशा सर्वांसाठीच उपयुक्त असे हे श्लोक आहेत. यातील निवडक श्लोक, त्यांचे अर्थ आणि ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे निरुपण आजपासून वाचकांसाठी खास प्रकाशित करण्यात येत आहेत.

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः।
ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि तं न रञ्जयति ।।

अर्थ - अज्ञानी व्यक्तीला सहजपणे संतुष्ट करता येते. विशेषतया ज्ञानसंपन्न व्यक्तीस त्याहून सुलभतेने संतुष्ट करता येते. मात्र थोड्याच ज्ञानाने गर्व करणा-या व्यक्तीला ब्रह्मदेवही संतुष्ट करू शकत नाही.

या श्लोकात भर्तृहरी तीन प्रकारच्या माणसांविषयी सांगतातः १. अज्ञानी २. विशेषतया ज्ञानसंपन्न आणि ३. अल्पज्ञानमात्रे एव गर्व करणारे लोक. भर्तृहरी सांगतात की, जर व्यक्ती अज्ञानी असेल, पण त्या व्यक्तीस एखादा विषय समजून घेण्याची इच्छा असेल, तर त्या व्यक्तीला समजावून सांगता येते. ती व्यक्ती समजून घेते. अर्थात अज्ञानी व्यक्तीचे समाधान करता येते. विशेषतया ज्ञानसंपन्न व्यक्तीचे समाधान करणे तर त्याहून सोपे असते. कारण अशा व्यक्तीकडे एखादा विषय समजून घेण्याची इच्छा तर असतेच, पण त्या सोबतच तो विषय समजून घेण्याची क्षमता देखील असते. म्हणून ज्ञानसंपन्न व्यक्तीस समजावून सांगणे आणि संतुष्ट करणे हे तुलनेने सुलभ असते. तिसरा प्रकार अशा लोकांचा असतो, ज्यांचे बाबतीत ज्ञान कमी, पण गर्व फार अशी स्थिती असते. ते लोक समजून घेण्याच्या मनःस्थितीतच नसतात. त्यामुळे अशा लोकांना समजावून सांगणे अशक्यप्राय गोष्ट होय. मला सर्व काही समजते, मीच काय तो शहाणा; अशी मानसिकता अंसेल, तर त्या व्यक्तीला समजावून सांगण्यास कोण बरे समर्थ आहे? अर्थातच कोणीही नाही. अशा प्रकारचे अल्प ज्ञानाने गर्व करणा-या लोकांविषयीचे वास्तव चित्रण भर्तृहरींनी प्रस्तुत श्लोकात केले आहे.

लभेत सिकतासु तैलमपि यत्नतः पीडयन्
पिबेच्च मृगतृष्णिकासु सलिलं पिपासार्दितः।
कदाचिदपि पर्यटञ्छशविषाणमासादयेत्
न तु प्रतिनिविष्टमूर्खजनचित्तमाराधयेत्।।

अर्थ - प्रयत्नपूर्वक वाळूला रगडून त्यातून तेल काढता येईल. कोणी क्षुधार्त मृगजळाचे पाणी प्राशन करील. कोणी शोधून शोधून सशाचे शिंग मिळवेल. पण दुराग्रहदुषित मूर्ख व्यक्तीच्या चित्ताला कोणीही संतुष्ट करू शकत नाही.

या श्लोकातही भर्तृहरींनी दुराग्रही व्यक्तीचे वर्णन केले आहे. दुराग्रही व्यक्ती सतत असंतुष्ट असते. त्या व्यक्तीला संतुष्ट करणे अशक्यप्राय होय. असे प्रतिपादन करताना भर्तृहरी काही उदाहरणे देतात. वास्तविक पाहता वाळूपासून तेल काढणे, मृगजळ प्राशन करणे आणि सशाची शिंगे या गोष्टी अशक्य मानल्या जातात. पण आपल्या आशयाचा उत्कर्ष किंवा प्रकर्ष स्पष्ट करण्यासाठी कवी सांगतात की, एक वेळ या अशक्य गोष्टी शक्य करता येईल; पण दुरागही व्यक्तीला संतुष्ट करता येणार नाही.




# लहान मुलांची भुक वाढवण्यासाठी

**ज्योतिर्मय साहित्य**

तसं बघायला गेलं तर साधारणपणे सर्वच मुलं जेवणाचा कंटाळा करताना दिसतात त्यामुळे भुक न लागणं हा कोणताही आजार नाहीये. पण हो, भूक न लागणं हा होणा-या आजाराचा संकेत जरुर असू शकतो. त्याव्यतीरिक्त मनासारखं जेवण किंवा चटपटीत गोष्टी न मिळाल्याने मुलं जेवताना किटकिट करत राहतात. म्हणूच मुलांना वेळेत जेवायला लावणं कठीण काम असतं. काही मुलं तर जेवण्यास स्पष्ट नकार देतात, त्यामुळे त्यांना तासनतास समजावत बसावं लागतं. तर काही मुलांना जेवण नाही तर मॅगी, न्युड्ल्स किंवा फास्ट फुड जास्त आवडतं आणि व्यव्स्थित न जेवल्याने त्यांना कमजोरी येते. त्यामुळेच जर तुमचीही मुलं जेवण्यास टाळाटाळ करत असतील तर त्यामागे काहीतरी गंभीर समस्या जन्म घेत असू शकते. न जेवल्याने शरीराला पोषक घटक किंवा जीवनसत्व न मिळाल्याने मुलं आजारी पडतात.



मुलाला आवडीचे पदार्थ खाऊ घालावेत –

मुलाला त्याच्या आवडीचे पदार्थ खाऊ घालावेत. रोजरोज एकसारखी भाजी खाऊन मुलांना कंटाळा येऊ शकतो. यासाठी वरचेवर नवीन पदार्थ मुलांना खाऊ घालावेत.

मुलांच्या बाहेरच्या खाण्यावर लक्ष ठेवावे – अनेकदा लहान मुले ही दिवसभरात चॉकलेट, बिस्किटे, केक, स्नॅक्स, चिप्स, फरसाण वैगरे पदार्थ खात असतात. त्यामुळे अशा पदार्थांनी आधीच पोट भरल्यामुळे जेवताना भूक लागत नाही. अशावेळी ते जेवण खाण्यास कंटाळा करतात. त्यामुळे लहान मूल दिवसभरात काय खातात याकडेही लक्ष द्यावे. मुलाला जेवताना भूक लागत नसल्यास काही दिवस त्याला फास्टफूड, बिस्किटे, चॉकलेट, स्नॅक्स असे पदार्थ देणे टाळावे.

मुलाला बाहेर खेळण्यास पाठवावे –

मैदानी खेळ खेळण्यामुळे मुलाचा व्यायाम होतो व खाल्लेल्या आहाराचे योग्यप्रकारे पचन होण्यास मदत होते. त्यामुळे खेळून- पळुन आल्यावर मुलाला चांगलीच भूक लागते ! त्यामुळे मुलाच्या व्यायामाकडे लक्ष द्यावे. सकाळी व संध्याकाळी त्याला फिरण्यास घेऊन जावे, मैदानी खेळ, दोरीउड्या, पळणे, सायकल चालवणे असे व्यायाम मुलाला करू द्यावेत.

लहान मुलांच्या भूक वाढीसाठी औषधे:

लहान मुलाची भूक वाढवण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने टॉनिक देता येईल. मुलाचे वय ६ वर्षांपेक्षा जास्त असल्यास आयुर्वेदिक औषधही भूक वाढवण्यासाठी देता येऊ शकतात.

मुलाला भूक लागत नसल्यास डॉक्टरांकडे कधी जावे ?

बहुतेकवेळा लहान मुलांना भूक न लागणे हे फारसे चिंताजनक बाब नसते. मात्र मुलाची भूक कमी होण्याबरोबरच जर त्याचे वजनही कमी होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# सुनीती चौधरी - भारतातील सर्वात लहान महिला क्रांतीकारक

**ज्योतिर्मय साहित्य**

**देशाच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी योगदान दिलेल्या त्या जगातील यशस्वी मुली ठरल्या. केलेला वध हा या दोघींनी विचारपूर्वक केलेला होता. कोलकता येथील न्यायालयात दोघींनाही जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. पोलीसांना न्यायालयात प्रफुल्लनलिनी ब्रम्हा यांचा सहभाग सिद्ध करण्यात अपयश आले. ही घटना भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यात आली आहे. सुनीती आणि शांता या दोघींनाही फाशीची शिक्षा होण्याची अपेक्षा होती. पण दोघींचीही वये १८ वर्षाच्या खाली असल्याने दोघींचीही फाशी वाचली. त्यांना कोर्टातच पत्रकारांनी विचारले असता त्या दोघी म्हणाल्या...‘‘ घोड्याच्या तबेल्यात जगण्यापेक्षा मरणे बरे.‘‘ त्या म्हणाल्या आम्हाला फाशीची शिक्षा झाली नाही त्यामुळे आम्हाला हौतात्म्य प्रात होणार नसल्याने आम्ही निराश आहोत.‘‘ सुनीती चौधरी भारतातील सर्वात लहान महिला क्रांतीकारक.**



**✻ लेखक ✻**
**शिरीष चिटणीस**

१४ डिसेंबर १९३१ रोजी सुनीती चौधरी आणि शांती घोष या दोन शाळकरी मुली संयुक्त बंगालच्या कोमिल्ला जिल्ह्याचे प्रमुख इंग्रज शासनाचे जिल्हाधिकारी चार्ल्स जेफ्री बकलँड स्टीव्हन्स यांना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेल्या. पोहण्याच्या स्पर्धेची परवानगी घ्यावी तसेच त्या काळात ज्या ठिकाणी या स्पर्धा घेण्यात येणार आहेत त्या ठिकाणच्या छोट्या बोटी हलविण्यात याव्यात तसेच सहकार्य करावे अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या अर्जात करण्यात आली होती. शाळकरी मुली असल्याने त्यांची कसून तपासणी करण्यात आली नाही. सादर केलेल्या अर्जावर स्टीव्हन्स यांची शिफारसही त्यांनी मागितली. चार्ल्स जेफ्री बकलँड अर्जावर शिफारस करीत असतानाच कपड्यांमध्ये लपवलेली पिस्तुले सुनीती चौधरी आणि शांती घोष यांनी बाहेर काढून त्यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारातच तात्काळ रक्ताच्या थारोळ्यात स्टीव्हन्स मृत्यूमुखी पडले. जिल्हाधिकारी कार्यालय असल्यानेच १४ वर्षाच्या सुनीती चौधरी आणि १५ वर्षाच्या शांती घोष यांना वेढा घालून अटक करण्यात आली. प्रचंड प्रमाणात त्यांना मारहाण करण्यात आली. दोघींनाही ताब्यात घेऊन कोर्टात अथवा पोलीस स्टेशनमध्ये न नेता ब्रिटीश तुरुंगात डांबण्यात आले. पहिल्यांदाच असे घडले कि, पोलीस स्टेशनमध्ये न नेता किंवा कोर्टामध्ये हजर न करता दोघींनाही थेटपणे तुरूंगात, कैद्यांना अशा प्रकारे डांबले गेले. दोघींनाही पोलिस व्हॅनपासून ते तुरुंगात नेईपर्यंत देशभक्तीपर गीते गायली. जवळ जमलेल्या लोकांना तेजोमय हास्य देत आणि दूरवरून आशिर्वाद घेत तुरुंगात पोहचल्या. ब्रिटीश शासनाचा असा कयास होता कि ज्या संघटनेने हे कृत्य घडवून आणले आहे ती संघटना या दोघींनाही सोडविण्याचा, प्रसंगी तुरूंग फोडून पळविण्याचा प्रयत्न करतील आणि त्यामुळे संघटनेचे स्वातंत्र्यासाठी झगडणारे जहाल कार्यकर्ते आपल्या ताब्यात येतील. पण त्यांची घोर निराशा झाली. दुस-या दिवशी पोलिसांच्या वतीने सुनीती चौधरी आणि शांती घोष यांच्याच कोमिल्ला शहरातील फैजुन्निसा शाळेत नववीच्या वर्गात शिकणा-या प्रफुल्लनलिनी ब्रम्हा यांना अटक करण्यात आली. १४ डिसेंबर १९३१ ते फेब्रुवारी १९३२ पर्यंत दोघींवर प्रचंड प्रमाणात दडपण आणून त्यांचे हाल करण्यात आले. त्यांच्याकडून या घटनेमध्ये कोण कोण सहभागी होते ते काढून घेण्यासाठी, न सांगता येणारेही प्रकार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण सुनीती चौधरी आणि शांता घोष बधल्या नाहीत. पहिल्यांदाच हिंदुस्थानात जुगंतर संघटनेनी दिलेली जबाबदारी दोघींनी योग्य पद्धतीने पार पाडली.कमी वयात अशा प्रकारचे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी योगदान दिलेल्या त्या जगातील यशस्वी मुली ठरल्या. केलेला वध हा या दोघींनी विचारपूर्वक केलेला होता. कोलकता येथील न्यायालयात दोघींनाही जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. पोलीसांना न्यायालयात प्रफुल्लनलिनी ब्रम्हा यांचा सहभाग सिद्ध करण्यात अपयश आले. ही घटना भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यात आली आहे. सुनीती आणि शांता या दोघींनाही फाशीची शिक्षा होण्याची अपेक्षा होती. पण दोघींचीही वये १८ वर्षाच्या खाली असल्याने दोघींचीही फाशी वाचली. त्यांना कोर्टातच पत्रकारांनी विचारले असता त्या दोघी म्हणाल्या...‘‘ घोड्याच्या तबेल्यात जगण्यापेक्षा मरणे बरे.‘‘ त्या म्हणाल्या आम्हाला फाशीची शिक्षा झाली नाही त्यामुळे आम्हाला हौतात्म्य प्रात होणार नसल्याने आम्ही निराश आहोत.‘‘ सुनीती चौधरी भारतातील सर्वात लहान महिला क्रांतीकारक.

सुनीती चौधरी यांचा जन्म २२ मे १९१७ रोजी त्यावेळच्या संयुक्त बंगालच्या आणि सध्याच्या बांगलादेशमध्ये कोमिल्ला जिल्ह्यातील कोमिल्ला येथे बंगाली कायस्थ कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नांव उमचरण चौधरी आणि आईचे नांव सुरसुंदरी चौधरी. त्या नवाब फैज्जुनेसा गव्हर्न्मेंट गर्ल्स हायस्कूल मध्ये शिकत होत्या. कोमिल्ला शहरात राहणा-या उल्हासकर दत्त यांच्या क्रांतीकारी कार्याचा सुनीती चौधरी यांच्यावर प्रभाव होता. बीना दास यांच्या छोट्या भगिनी असलेल्या कल्याणीदेवी दास ज्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता त्यांच्यामुळे सुनीती चौधरी जुगंतर या जहाल स्वातंत्र्यलढ्यातील संघटनेशी जोडल्या गेल्या. प्रफुल्लनलिनी ब्रम्हा यांच्यासह त्या जुगंतर पक्षात भरती होऊन लढाऊ शिक्षण घेत होत्या. त्या त्रिपुरा जिल्हा छत्री संघाच्या सदस्या होत्या. १६ मे १९३१ रोजी झालेल्या त्रिपुरा जिल्हा छत्री संघाच्या वार्षिक परिषदेत सुनीती चौधरी यांची महिला स्वयंसेवक संघाच्या कॅप्टन म्हणून निवड करण्यात आली. याकाळात त्यांना मीरा देवी या उपनामाने ओळखले जात असे. ६ माहिन्याच्या प्रशिक्षण कालावधीत त्या अचूकपणे बंदूक चालवायला शिकल्याने त्यांची बंदुकधारी म्हणून निवड करण्यात आली. तसेच छत्री संघाच्या महिला सदस्यांना लाठी, तलवार, आणि खंजीर खेळण्याचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. विद्यार्थी संघटनेला संबोधित करण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस कोमिल्ला शहरात असतांना त्यांनी मुलींच्या परेडचे नेतृत्व केले.प्रफुल्ल नलिनी ब्रम्हा यांनी क्रांतिकारी चळवळीतील महिलांच्या भूमिकेबद्दल बोस यांना त्यांचे विचार विचारले. विराम न देता,सुभाषचंद्र बोस उत्तरले, ‘‘तुम्हाला पुढच्या रांगेत पाहून मला आनंद होईल.’’ सायमन कमीशन भारतात आल्यानंतर त्यांच्याविरुद्ध सायमन गो बॅक‘ चळवळीपासून लाला लजपतराय, यतींद्रनाथ दास, भगतसिंग , सुखदेव, राजगुरु, चंद्रशेखर आझाद आणि इतर अनेक स्वातंत्र्यसैनिकांवर अत्याचार करण्यात आले. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांना फाशी देण्यात आले. इंग्रज शासकामधील आधिकारी प्रचंड प्रमाणात खटले दाखल करणे, एन्काउंटर, अटक, फाशी, दहशत या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्यातील संघटनांचे जाळे उध्वस्त करीत असताना मोठा धमाका करून स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांना बळ देण्याची आवश्यकता होती. याच काळात कोमिल्ला जिल्ह्याचे जिल्हाधिकारी चार्ल्स जेफ्री बकलँड स्टीव्हन्स यांचा जिल्ह्यामधील अत्याचाराचा वावर टोकाला गेला होता. स्टीव्हन्स याचा वध करण्यासाठी सुनीती चौधरी, शांता घोष आणि प्रफुल्लनलिनी ब्रम्हा या तिघींची जुगंतर संघटनेतर्फे निवड करण्यात आली. तिघींनी रिव्हॉल्वर शूटिंगमध्ये सक्रीयपणे भाग घेतला. आणि बिरेन भट्टाचार्य यांच्याकडून मार्शल आर्टसमध्ये प्रभुत्व मिळवले. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यास उत्सुक असलेल्या या तिघींनीही त्यांचे नेते अखिल नंदी आणि बिरेन्द्रनाथ भट्टाचार्य यांना मुलांइतकेच प्रमुख भूमिका देण्यास सांगितले. जिल्हा दंडाधिकारी स्टीव्हन्स यांच्या हत्येच्या योजनेत त्यांना सहभागी करून घेण्यास नंदी आणि भट्टाचार्य यांनी सहमती दर्शवली. योजना पूर्ण होणार असतानाच, संघटनेच्या हितासाठी प्रफुल्लनलिनी ब्रम्हा यांना या योजनेतून वगळण्यात आले. परंतु सुनीती आणि शांता या दोघी अल्पवयीन शाळकरी मुलींनी काम फत्ते केल्यामुळे जगभर भारतीय स्वातंत्र्य लढ्याची धगधगती मशाल सर्वांपर्यंत पोहोचली. शाळकरी मुले-मुली सुद्धा पूर्ण सजगपणे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये भाग घेत असल्याचे स्पष्ट झाले. जगभर आलेल्या बातम्यांमुळे शिथील पडत चाललेला स्वातंत्र्य लढ्यातील युवकांचा सहभाग वाढला. सुनीती चौधरी यांना हिजली डिटेन्शन कॅम्पमध्ये ‘‘तृतीय श्रेणी कैदी‘‘ म्हणून बंदीवासात ठेवण्यात आले होते. तिथे असणारे कैदी क्रूर आणि पटाईत असे असल्याने तिच्या जीवनावरही त्याचा परिणाम झाला. उत्कट देशप्रेम असणाऱ्या सुनीती चौधरी यांनी सर्व हाल अपेष्टा सहन करीत असतानाच कैदेतील स्त्रीयांना आपल्यापरीने शिक्षीत करण्याचाही प्रयत्न केला. सुनीता चौधरी यांचे वडील उमचरण चौधरी हे सरकारी नोकरीत असल्याने त्यांची नोकरी आणि निवृत्तीवेतन बंद करण्यात आले. त्यांच्या दोन्ही मोठ्या भावांना कोणत्याही खटल्याशिवाय कोठडीत ठेवल्यामुळे सुनीतीच्या शौर्य कृत्याच्या कार्याचा परिणाम इंग्रज शासनाच्या अघोरी कृत्यामुळे तिच्या कुटुंबालाही सहन करावा लागला. तिचा धाकटा भाऊ टी.बी. असल्यामुळे तसेच सकस अन्न व औषधे न मिळाल्यामुळे तसेच कुपोषणामुळे मृत्युमुखी पडला. सुनीतीच्या घराची वाताहत झाली. दुसरे महायुद्ध चालू झाले आणि हिंदुस्थानचा पाठींबा इंग्लंडला आवश्यक असल्याने महात्मा गांधी आणि ब्रिटीश शासनाच्या झालेल्या चर्चेन्वये तसेच करारान्वये चळवळीतील जहाल तसेच मवाळ कार्यकर्त्यांना जे सजा भोगत होते त्यांची सुटका करण्यात आली. सात वर्षाची शिक्षा भोगल्यानंतर सुनीती चौधरी यांचीही महात्मा गांधीच्या या शिष्टाईने सूटका झाली. सुनीती चौधरी आणि शांती घोष यांचा उल्लेख सार्वजनिक आणि पाश्चिमात्य नियतकालिकांनी स्टीव्हन्स यांच्या हत्येबद्दल ‘‘अर्ल ऑफ विलिंग्डनच्या अध्यादेशाविरुध्द भारतीयांच्या संतापाचे लक्षण म्हणून चित्रीत करीत, भारतीय नागरी हक्कांचे दडपशाहीविरुद्ध तसेच भाषण स्वातंत्र्याला अटकाव याविरुद्ध केलेला यशस्वी प्रतिकार‘‘ असा केला होता. तसेच ज्यावेळेला कोर्टाने दोघीनाही आमरण कारावास शिक्षा ठोठावली त्यावेळी राजशाही जिल्ह्यातील पोलिसांच्या गुप्तहेर शाखेला सुनीती चौधरी आणि शांता घोष यांची राष्ट्रवादी नायिका म्हणून प्रशंसा करणारा पोस्टवरून संदेश सापडला. पोस्टरमध्ये ‘‘तू आता स्वतंत्र आणि प्रसिद्ध आहेस‘‘ असे त्यात लिहिले होते. तसेच रॉबर्ट बर्न्सच्या स्कॉटस वॉ या कवितेतील ओळींसोबत दोन मुलींची छायाचित्रे प्रदर्शित केली होती. या दरम्यान प्रफुल्लनालिनी ब्रम्हा यांना हिजली कॅम्प मधेच ठेवण्यात आले होते,जिथून त्त्यांनी बी.ए.चे शिक्षण पूर्ण केले.१९३६ मध्ये ब्रम्हा ला कोमिल्ला येथे परत आणण्यात आले.तिने काही काळ तिच्या गावी काक्सा येथे नजरकैदेत असताना इंटर्नशिप केली.नजरकैदेत असताना तीला क्रोनिक अपेंडिक्सचा त्रास झाला,परंतु पोलिसांनी कलकत्ता येथे उपचारासाठी नेण्यास नकार दिल्याने त्यांच्या २४ व्या वाढदिवशी २२ फेब्रुवारी १९३७ रोजी कोमिल्ला येथे त्यांचे निधन झाले.



सूटका झाली तेंव्हा सुनीती २२ वर्षाची होती.६ डिसेंबर १९३९ रोजी जेव्हा सुनीति चौधरी जेलमधून सुटून घरी आल्या तेंव्हा घरची हालत अत्यंत वाईट होती. औपचारिक शिक्षण नसलेल्या सुनीताच्या मदतीस हलाखीत जीवन व्यतीत करणारा फक्त भाऊ होता. पण तीला घरंच नव्हते. अशावेळी कल्याणीदेवी दास ज्या अनाथ महिलांसाठी सामाजिक संस्थेमार्फत रहाण्याची जिथे व्यवस्था करीत होत्या तिथे जाऊन सुनीती राहिल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या मुळे शाळा भरत नव्हत्या. त्याचवेळी बंगालमध्ये स्पेशल परीक्षा घेण्यात आली आणि त्यात सुनीती प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन रोज १० कि.मी. जाणे व पुन्हा येणे असे करत सायन्स विषयात अभ्यास केला. हत्येचा ठपका असल्याने तसेच इंग्रज शासनाच्या भितीमुळे त्यांना कोणीही मदत करीत नसे. नातेवाईक पण मदत करीत नसत. अशातच कलकत्ता येथील स्वातंत्र्य सैनिक प्रद्युतकुमार घोष जे स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होते त्यांनी आपल्या कलकत्ता येथील घरी सुनीती चौधरी यांच्या राहण्याची सोय केली. कॉलेजच्या शिक्षणासाठी प्रद्युतकुमार घोष यांची बहीण सुनीती यांना इंग्रजी शिकवायची तर प्रद्युतकुमार घोष सुनीती यांना गणित, विज्ञान शिकवायचे. मेडीकल कॉलेजमध्ये सुनीती चौधरी यांना प्रवेश मिळाला. आणि त्यावेळची एम.बी म्हणजे आजची एम.बी.बी.एस. ही पदवी घेऊन त्या १९४४ साली डॉक्टर झाल्या. १९४७ मध्ये सुनीती चौधरी यांनी ट्रेड युनियनचे नेते माजी राजकीय कैदी प्रद्युतकुमार घोष ज्यांनी त्यांना कठीण प्रसंगी आसरा दिला तसेच अभ्यास करून घेतला त्यांच्याशी विवाह केला. त्यांना एक कन्यारत्न झाले जे पुढे भारती सेन नावाने नावारूपाला आले.

चंदननगर जी फ्रान्सची वस्ती होती, तिथे त्यांनी डॉक्टर म्हणून काम केले. तिच्या दयाळूपणामुळे आणि समर्पणामुळे डॉक्टर सुनिती यांच्या कौशल्याने तिला पटकन चंदन नगर मध्ये एक नामांकित डॉक्टर बनवले. जिथे लोक तिला प्रेमाने लेडी माँ म्हणत. १९५१-५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. सुनीती घोष यांना कॉंग्रेस आणि कम्युनिस्ट पक्षांकडून तिकीट देण्याची ऑफर देण्यात आली, जी त्यांनी ठामपणे नाकारली. तिला राजकीय नाटकांमध्ये रस नव्हता.ज्याने आधीच तिच्या योगदानाला कमी लेखले होते. त्यानंतर तिने आपल्या कारकिर्दीसाठी राजकीय लढाया सहन केल्या. सुनीती केवळ आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र नव्हती, तर तिने तिच्या भावांना त्यांच्या व्यवसायात मदत केली आणि तिच्या अर्धांगवायू झालेल्या पालकांच्या काळजीमध्ये हातभार लावला. तिला मुले आणि निसर्गाची आवड होती.

मुलांना बागकाम, पोहणे आणि निसर्ग अभ्यास त्यांनी शिकवला. तिने आपल्या मुलीला, भारती सेन ला वेगवेगळे प्रसंग आणि सण साजरे करण्यासाठी प्रोत्साहित केले. देशभक्ती, शौर्य, दयाळूपणा आणि प्रेरणेचा वारसा मागे ठेवून तिने १२ जानेवारी १९८८ रोजी अखेरचा श्वास घेतला. त्यांनी कधीही स्वातंत्र्यलढ्याची पेन्शन स्वीकारली नाही. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सिंगापूरमध्ये शालेय विद्यार्थिनी शांती घोष आणि सुनीती चौधरी यांचा उल्लेख निर्भय पराक्रमाचे स्मरण करून भारतीय महिलांच्या शौर्याचा उल्लेख आयएनएच्या राणी झाशीच्या कॅडेसना केला होता.

✻✻✻

# ‘संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई’ १८ एप्रिलला भेटीला



**ज्योतिर्मय साहित्य**

भक्त संप्रदायातील अगदी लहान वयात मान्यता पावलेली देदीप्यमान शलाका म्हणजे संत मुक्ताबाई!

बुद्धिमान, ज्ञानी अशा संतांना आपल्या प्रखर विद्वत्तेने आणि अधिकारवाणीने गुरुमंत्र देऊन ही शलाका तळपती झाली. अशा संत मुक्ताबाईचे आणि त्यांच्या कुटुंबाचे प्रेरणादायी चरित्र उलगडून दाखवणारा दिग्पाल लांजेकर लिखित-दिग्दर्शित ‘संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई’ हा भव्य मराठी चित्रपट १८ एप्रिलला आपल्या भेटीला येतोय. रेश्मा कुंदन थडानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून चित्रपटाची प्रस्तुती ए.ए.फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे.

सप्रेम निवृत्ती आणि ज्ञानदेव ।
मुक्ताईचा भाव विठ्ठलचरणी ।
-संत चोखामेळा

आदिमाया आदिशक्ती संत मुक्ताईला भेटूया १८ एप्रिल २०२५ पासून आपल्या जवळच्या चित्रपटगृहात.. अशा कॅप्शनसह आलेल्या या पोस्टरमधून चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. या पोस्टरमध्ये संत ‘मुक्ताई’ विठूरायाची आराधना करताना दिसते आहे. देहरूपाने संपले तरी कार्यरूपाने संजीवन असणाऱ्या मुक्ताबाईच्या कार्य व विचारांना जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी मुक्ताई’ने निभावलेल्या माता ,भगिनी, गुरु अशा विविध भूमिकांचे पदर ‘संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई’ चित्रपटातून उलगडणार आहेत. स्त्री-पुरुष भेदापलीकडे जगणे शिकविणाऱ्या संत मुक्ताईचा खडतर आणि भक्तीरसाने परिपूर्ण जीवनप्रवास आजच्या पिढीला ज्ञात व्हावा यासाठी ‘संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई’ हा वेगळा प्रयत्न केल्याचे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर सांगतात.

संगीताची जबाबदारी अवधूत गांधी, देवदत्त बाजी यांनी सांभाळली आहे. छायांकन संदीप शिंदे तर संकलन सागर शिंदे, विनय शिंदे यांचे आहे. कलादिग्दर्शन प्रतीक रेडीज तर ड्रोन आणि स्थिरछायाचित्रण प्रथमेश अवसरे यांचे आहे. रंगभूषेची जबाबदारी अतुल मस्के तर वेशभूषेची जबाबदारी सौरभ कांबळे यांनी सांभाळली आहे. नृत्यदिग्दर्शन किरण बोरकर तर ध्वनीआरेखन निखिल लांजेकर यांचे आहे. पार्श्वसंगीत शंतनू पांडे यांनी दिले आहे. साहसदृश्ये बब्बू खन्ना यांची आहेत. सहनिर्माते सनी बक्षी आहेत. केतकी गद्रे अभ्यंकर कार्यकारी निर्मात्या आहेत.




हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559